Surabhi
Maam
F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६, ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in , वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ : रजिस्टर एडी / ईमेल द्वारे

क्र.:१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२०-२१/ ३३०
दि. - १४/ १०/२०२०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

**विषय :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांची प्रगती व सक्षम शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२१ च्या अंमलबजावणी बाबत...**

उपरोक्त विषया संबंधी कळविण्यात येते कि, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांची प्रगती व सक्षम शिष्यवृत्ती योजनांची महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलबजावणी साठी **तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई** यांना नोडल ऑफिस म्हणुन घोषित करण्यात आले आहे. सदर दोन्ही योजनांची माहिती खालीलप्रमाणे.

## अ) प्रगती शिष्यवृत्ती योजना -

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी) शिकणाऱ्या **विद्यार्थिनीं** साठी प्रगती शिष्यवृत्ती योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८ लाखापर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे.

या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा संच निर्धारीत करण्यात आला आहे

- नविन संच/कोटा (Quota)

| राज्य | अ क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | ६२४ |
| | २ | पदवी | ५५३ |

- शिष्यवृत्ती रक्कम

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे घटक | एक रक्कम ( Lump sum Amount ) |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु.५०,०००/- प्रति वर्ष |



INWARD
Recd. on 27/10/2020
Inward No. 157
Initials

To Surabhi Maam

## ब ) सक्षम शिष्यवृत्ती योजना -

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **विशेष सक्षम विद्यार्थ्यांसाठी** सक्षम शिष्यवृत्ती योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८.०० लाखा पर्यंत व दिव्यांगाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा अधिक** असावे असे निश्चित करण्यात आलेले आहे.

- नविन संच/कोटा ( Quota )

| राज्य | अ क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | सर्व पात्र |
| | २ | पदवी | सर्व पात्र |

- **शिष्यवृत्ती रक्कम**

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे घटक | एक रक्कम ( Lump sum Amount ) |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु.५०,०००/- प्रति वर्ष |

उपरोक्त योजनांची सविस्तर माहिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळ www.aicte-india.org वर देण्यात आलेली आहे.

सदर योजनांची मंजुर रक्कम Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarships Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सन २०२०-२१ च्या सदर योजनेच्या लाभासाठी **प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षात नव्याने प्रवेशित** विद्यार्थ्यांनी NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना सुचित करण्यात येत की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना उपरोक्त योजनांबाबत सुचित करण्यात यावे ( तसेच संस्थांनाही विद्यार्थ्यांना सुचना देण्याबाबत कळविण्यात यावे ).

संस्थांनी NSP Portal च्या लॉगिन आयडी व पासवर्डचा वापर करून प्राप्त झालेल्या अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन-रित्या तपासणी ( मंजूर/नामंजूर ) करावी.